# राजकीय नेतृत्वाची दिवाळखोरी

चन्द्रशेखर पुरन्दरे

या लेखात चार घटनांचा आढावा घेतला आहे. शेवटच्या दोन सांकेतिकमात्र महत्त्वाच्या आहेत.

**ब्रिटन**

ब्रिटनने युरोपिअन युनिअनमधून बाहेर पडावे [ब्रेक्झिट] या मुद्यावर गेली तीन वर्षे गदारोळ चालू आहे.

युरोपिअन युनिअन ही युरोपातील २८ देशांची व्यापारी व राजकीय संघटना आहे. तीत येण्याजाण्याची, दुसऱ्या देशात स्थायिक होण्याची युनियनच्या नागरिकांना मुभा असते. व्यापाराची सुलभता असते. या सवलतींचा ब्रिटनला तोटा होतो असे 'बाहेर पडावे' या मताचा रोख. ['आमच्या नोकऱ्या हे आगंतुक घेतात', युनिअन पैसे घेते मात्र, परत काहीच देत नाही, इत्यादी] तर युनिअनमध्ये रहाण्याचा ब्रिटनला फायदा आहे असे 'युनियनमध्ये रहावे' या मताचा रोख. [पैशाची/मालाची आयात/निर्यात सोपी व स्वस्त असते, परदेशी नोकऱ्या मिळू शकतात.]

यात ब्रिटनची रचना लक्षात घेणे महत्त्वाचे. उत्तर आयर्लंड, स्कॉटलंड, इंग्लंड आणि वेल्स या चार प्रांतांची एकत्र मोट म्हणजे 'ग्रेट' ब्रिटन किंवा युनायटेड किंगडम. यातील स्कॉटलंडचे इंग्लंडशी कधीच जमले नाही. तोच प्रकार थोड्याफार प्रमाणात उत्तर आयर्लंडचा. स्कॉटलंड युनिअनमध्ये राहावे या मताचा तर आयर्लंड अजून संदिग्ध.

या प्रश्नावर २०१६मध्ये सार्वमत झाले. त्यात ५२ टक्के ब्रिटिशांनी 'बाहेर पडावे' असा कौल दिला. [सविस्तर आढावा – 'आंदोलन' - ऑगस्ट २०१६] तेव्हापासून हा गोंधळ चालू आहे.

दरम्यान तेरेसा मे या पंतप्रधान आल्या आणि अयशस्वी होऊन गेल्या. कारण ब्रिटनला युनिअनमध्ये राहण्याचे फायदेही हवे होते आणि तोशीस काहीच घ्यायची नव्हती. हे युनियनला मान्य नव्हते. त्यांच्यानंतर बोरिस जॉन्सन पंतप्रधान झाले. हा इसम खास इंग्रजी साम्राज्यवादी परंपरेतील. तृणमूलाशी सम्बन्ध तर नाहीच तर त्यांच्याबाबत तुच्छता. ट्रम्पसारखीच कोणत्याही विषयाचा सखोल अभ्यास करण्याची अनिच्छा. त्यानुसार त्याने ब्रिटनने ताबडतोब युनिअनमधून बाहेर पडावे अशी भूमिका घेतली. 'जितक्या लवकर तितके श्रेयस्कर'. गेले काही महिने अनेक उलटसुलट कोलांट्या मारत त्याची कारकीर्द चालू आहे. त्याच्या छातीठोक घोषणेप्रमाणे प्रथम ब्रेक्झिट ३१ ऑक्टोबरला होणार होता, ती तारीख कधीच उलटून गेली. आता ३१ जानेवारी नवीन तारीख आहे.

दरम्यान या अनिश्चिततेमुळे आंतरराष्ट्रीय भांडवल ब्रिटन, विशेषत: लंडनमधून इतर देशी जायला सुरुवात झाली आहे. ब्रिटिश नोकऱ्यांवर गदा येत आहे, IT क्षेत्र ब्रिटन सोडत आहे, उर्वरित ब्रिटनमध्ये समाजसेवी खाती बंद होत आहेत, धोरणात्मक निर्णय ठप्प झाले आहेत.

१२ डिसेंबरच्या लोकसभेच्या निवडणुकांमध्ये जॉन्सनचा हुजूर पक्ष मोठ्या बहुमताने निवडून आला. त्यामुळे त्याला लोकमान्यताही लाभली आहे. लोकांनी त्याच्या बाजूने मतदान का केले, अपप्रचाराला मतदार कसे फसले हा निराळ्या लेखाचा विषय होईल. पण लोकशाहीवरील विश्वास उडावा अशी ही घटना आहे. त्यात स्कॉटलंडने पुन्हा सार्वमत घ्यावे ही मागणी लावून धरली आहे. तेथून या मताचे खासदारही मोठ्या प्रमाणावर निवडून आले आहेत. उत्तर आयर्लंड वर म्हटल्याप्रमाणे अजून संदिग्ध आहे. येत्या काही काळात ब्रिटन 'ग्रेट' रहाणार नाही, स्कॉटलंड व कदाचित उत्तर आयर्लंड त्यातून बाहेर पडतील ही दाट संभावना आहे. आणि युनिअनही ब्रिटनला इतक्या सहजी बाहेर पडू देणार नाही.

**मियानमार**

द हेग येथील आंतरराष्ट्रीय कोर्टात मियानमारमधील रोहिंग्या मुस्लिमांच्या कत्तलीविरुद्ध खटला चालू आहे. ही कत्तल गेली काही वर्षे चालू आहे. ती मियानमारचे बौद्ध सैन्य राखीन प्रांतातील

मुसलमानांविरुद्ध करते. त्यात ठार मारणे, गावे जाळणे [आजवर ३९२ गावे], भ्रूणहत्या, स्त्रियांवर बलात्कार असे अनेक प्रकार झाले आहेत. त्यामुळे साडेसात ते दहा-अकरा लाखाहून जास्त लोक देशोधडीला लागले आहेत. ते बांगलादेश, इंडोनेशिया, मलेशिया, थायलंड या देशांना निर्वासित म्हणून गेले आहेत. तेथे बकाल छावण्यात राहतात. [या प्रश्नाचा सविस्तर आढावा – 'आंदोलन', ऑक्टोबर २०१७] या अत्याचाराविरुद्ध द गांबिया या आफ्रिकन देशाने वंशच्छेद या गुन्ह्याखाली मियानमारविरुद्ध हेगच्या कोर्टात खटला भरला. त्यात मियानमारच्या सर्वोच्च नेत्या आंग सू यांची तीन दिवस साक्ष/तपासणी झाली. सू या मियानमारच्या लष्करी नेतृत्वाविरुद्ध अनेक वर्षे अहिंसक मार्गाने लढलेल्या आहेत, त्यांना त्या राजवटीने दशकभर स्थानबद्धही केले होते. त्यांना शांततेचा नोबेल पुरस्कार मिळालेला आहे. त्या रोहिंग्याच्या बाजूने उभ्या रहातील व विद्यमान राजवटीला जाब विचारतील ही जगाची २०१६ पासून अपेक्षा होती, तसे झाले नाही. त्यांचा पुरस्कार मागे घ्यावा इथपर्यंत मागण्या झाल्या. या साक्षीतही त्यांनी प्रश्नाचे गांभीर्य मान्य केले नाही.] हा वंशसंहार होता हेच अमान्य केले. आमच्या देशाच्या कायदेकानूनप्रमाणे गुन्हेगारांवर कारवाई करण्यात येईल, मियानमारवरील सर्व आरोप रद्द करावेत अस पवित्रा घेतला. जी व्यक्ती मानवी हक्कांसाठी आयुष्याची महत्त्वाची वर्षे खर्च करते, इंग्लंडमध्ये असलेल्या कुटुंबापासून विभक्त रहाते तिच्याकडून ही मोठीच निराशा. ज्या लष्करी राजवटीविरुद्ध त्या लढल्या, त्याच लष्करी अत्याचारांचे त्यांनी समर्थन करावे हा दैवदुर्विलास आहे.

### पाकिस्तान

पाकिस्तानात माजी सेनाध्यक्ष व अध्यक्ष परवेझ मुशर्रफ यांना तेथील विशेष कोर्टाने फाशीची शिक्षा दिली आहे. मुशर्रफने २०१४ साली आणीबाणी जाहीर केली होती. हे कृत्य अत्यंत गंभीर देशद्रोह असल्याचे कोर्टाने म्हटले आहे. त्यासाठी जास्तीत जास्त शिक्षा म्हणजे फाशी देण्यात आली आहे. हा निर्णय पाकिस्तानात अभूतपूर्व आहे. तेथे लष्कर सत्ताधीश ठरवते व सत्ताधीश लष्कराला नाराज करत नाहीत. न्यायसंस्था या दोन्हीच्या हातातील बाहुले असते. त्यामुळे स्वातंत्र्यानंतर अनेकदा लष्कराने सत्ता बळकावली असूनही त्याविरुद्ध कायदेशीर कारवाई झालेली नाही. आताही मुशर्रफविरुद्धचा खटला लांबवण्याचा इम्रान खानच्या सरकारने बराच प्रयत्न केला. कारण निर्णय मुशर्रफविरुद्ध गेला तर लष्कर दुखावले जाईल. या पार्श्वभूमीवर हा निर्णय अत्यंत महत्त्वाचा व स्वागतार्ह आहे. मुशर्रफ सध्या वैद्यकीय शुश्रुषेसाठी दुबईत आहेत. त्यांना तेथून पाकिस्तानला आणणे व फाशी देणे संभवनीय नाही. पण निर्णयाला सांकेतिक महत्त्व आहे.

### अमेरिका - ट्रम्प

अशीच दुसरी सांकेतिक महत्त्वाची घटना अमेरिकेत १८ डिसेंबरला घडली. अध्यक्षपद स्वीकारल्यापासून ट्रम्प यांचे वर्तन त्या पदाच्या प्रतिष्ठेचे राहिलेले नाही. अध्यक्षाने वैयक्तिक आर्थिक लाभाचे व्यवहार बंद करावेत, आपले आधीचे आर्थिक व्यवहार पारदर्शकपणे जाहीर करावेत असे अनेक संकेत त्यांनी झुगारले. शिवाय अगदी हीन पातळीवर जाऊन ज्यांच्याशी विवाहबाह्य लैंगिक संबंध होते अशा स्त्रियांना धमक्या किंवा पैसे देऊन ती प्रकरणे दाबण्याचाही प्रयत्न केला. राजकीय विरोधकांना देशद्रोही मानणे ही आत्मकेंद्रित सत्ताधीशांची जगभर आढळणारी वृत्तीही ट्रम्पच्या कारकीर्दीत बळावली. अशा सततच्या गैरवर्तनाने दिरोधी डेमोक्रॅटिक पक्षात असंतोष वाढत गेला. त्याचा अपेक्षित परिणाम झाला.

रशियाला शह म्हणून युक्रेन या देशाला मोठी लष्करी मदत अमेरिकन सरकारने मान्य केली होती. ती मदत देण्यासाठी ट्रम्पने शर्ती घातल्या. त्या शर्ती देशहितासाठी नसून स्वत:च्या राजकीय फायद्यासाठी होत्या. हा गुन्हा झाला. याची पार्श्वभूमी अशी : २०२० च्या अध्यक्षीय निवडणुकीत ट्रम्प रिपब्लिकन पक्षाचा उमेदवार असेल तर विरोधी डेमोक्रॅटिक पक्षाचा उमेदवार अजून ठरायचा असला तरी काही काळापूर्वीपर्यंत बायडेन हा आघाडीचा उमेदवार होता. [तो अजूनही अधिकृत उमेदवार होऊ शकतो.] तो ओबामाचा उपाध्यक्ष होता. त्याचा मुलगा युक्रेनमधील एका मोठ्या कंपनीच्या संचालक मंडळावर होता. त्याच्यावर आणि थोरल्या बायडेनवर राळ उडवण्यासाठी युक्रेन सरकारने माहिती गोळा करावी असा ट्रम्पचा प्रयत्न. ज्यायोगे

(पान ३६ वर)

Marathi-Monthly - Andolan Shashwat Vikasasathi, Editor-Medha Patkar. Postal Regn. No. MCE/296/2018-20
RNI No. MAHMAR/2009/30128 Licence to Post without Prepayment No. MR/Tech WPP/East/358/2019
Date of Publication 1st of every month Date of Posting 1st of every month Posted at Dadar P.O. 400014.

**(राजकारण : पान २५ वरून)**

यांचा एक प्रचंड ताफा राजवाड्यातील राजे आणि देवळातील देव यांच्या मनोरंजनार्थ निर्माण केला होता. ज्यांना जिज्ञासा असेल त्यांनी प्राचीन विक्रमशीला विद्यापीठाचा अभ्यासक्रम चाळून पहावा.'' (शिवरात्र, पृ. २९-३०, नरहर कुरुंदकर, साधना प्रकाशन)

काही प्रकल्प हाती घेतले तर शिवसेना त्याला विरोध करील, असे समजणे हा भाबडेपणाच मानावा लागेल.

मग प्रश्न असाही उभा राहतो की, राष्ट्रीय स्वयंसेवक संघ बदलणार नाही का ?

तसे समजण्याचे कारण नाही. कारण बदलणे हा सृष्टीचा धर्म आहे. पण माणसातील बदलासाठी इच्छाशक्ती हवी. गेले जवळपास शतकभर संघ ज्या विचारांच्या आणि मूल्यांच्या आधारे मार्गक्रमणा करीत आहे त्यातील सनातनी आणि पारंपारिक, सरंजामी विचारांची वस्त्रे-वैकल्ये उतरवून त्याऐवजी समता, समताधारित न्याय यांसारखी आधुनिकतावादी मूल्ये व त्यांना पूरक अशा विचारप्रणालीचा स्वीकार करावा लागेल. अशा नव्या मूल्यांचा, विचारप्रणालीचा स्वीकार केला की आपली वाटचाल समग्र परिवर्तनाच्या दिशेने सुरू होते. ही वाटचाल सर्वसमावेशक असते. म्हणून इतर धर्मीयांचा विद्वेष करण्याची गरज राहात नाही. कारण तो सर्वांच्या विकासाचा मार्ग असतो.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या शब्दांत सांगायचे तर, 'सब का विकास, सब का साथ' आणि 'सब का विश्वास' संपादन करण्याचा तो मार्ग असतो. रा. स्व. संघाची याला तयारी आहे का, हा या संदर्भातील महत्त्वाचा प्रश्न आहे.

(दै. लोकसत्तेच्या सौजन्याने)

arumukadam@gmail.com

**(जगभर : पान ३३ वरून)**

बायडेनची उमेदवारी खच्ची होईल. त्यासाठी ट्रम्पने युक्रेनच्या अध्यक्षांवर दडपण आणले.

हे प्रकरण ट्रम्पला महागात जात आहे. सत्तेचा गैरवापर या आरोपावरून त्याची अध्यक्ष म्हणून उचलबांगडी करावी हा विरोधी डेमोक्रॅटिक पक्षाचा प्रयत्न सुरू झाला. अमेरिकन अध्यक्षाला मुदतपूर्व काढण्याची काही पद्धत असते. त्यानुसार अमेरिकेच्या दोन्ही संसदगृहांची अशा प्रस्तावाला मंजुरी लागते. यातील एका संसदगृहात डेमोक्रॅटिक बहुमत आहे तर दुसऱ्यात रिपब्लिकन. जेथे डेमोक्रॅटिक बहुमत आहे, त्या गृहाने अध्यक्षांची Impeachment [चौकशी] करावी असा ठराव मंजूर केला. अशी वेळ येणारा ट्रम्प हा अमेरिकेच्या इतिहासातील तिसरा अध्यक्ष. एकवीस वर्षांपूर्वी बिल क्लिंटन आणि त्याआधी १८६८ साली तेव्हाच अध्यक्ष जॉन्सन यांची impeachment झाली होती. दोघांवरही पदच्युतीची वेळ आली नाही. तशीच ती ट्रम्पवरही न येण्याची शक्यताच जास्त. कारण संसदेच्या दुसऱ्या गृहात रिपब्लिकन बहुमत आहे आणि ते हा ठराव फेटाळतील. म्हणून ही सांकेतिक महत्त्वाची घटना. यामुळे ट्रम्पच्या वर्तनात इष्ट फरक पडणे कठीण आहे.

www.art-non-deco.com
artnondeco@yahoo.co.uk

To,

'शाश्वत विकास न्यास'च्या मालकीचा 'आंदोलन - शाश्वत विकासासाठी'चा हा अंक संपादक, मुद्रक, प्रकाशक मेधा पाटकर यांनी 'श्री गुरुकृपा प्रिंटर्स' १२१, अलाइड इंडस्ट्रियल इस्टेट, राम पंजवानी मार्ग, माहिम, मुंबई ४०००१६ येथे छापून दादर, मुंबई येथून प्रकाशित केला.
**प्रेषक : २९-३०, पहिला मजला, 'ए' विंग, हाजी हबीब बिल्डींग, नायगाव क्रॉस रोड, दादर (पूर्व), मुंबई ४०००१४.**